स्थळप्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** अक्कलकोट उत्तर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0127 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/03/2024 02:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 14/03/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/03/2024
**Time From (वेळेपासून):** 17:26 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/03/2024 **Time (वेळ):** 01:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/03/2024 01:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती अक्कलकोट येथील च, राज्य परीवहन नियंत्रक कार्यालय,सोलापूर विभाग पासुन सम्राट चौक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विनोद ब्राम्हानंद अस्वले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नेमणूक अक्कलकोट बस डेपो नेमणू,मुपो उमर्गे, ता अक्कलकोट, ज, अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नेमणूक अक्कलकोट बस डेपो नेमणू,मुपो उमर्गे, ता अक्कलकोट, ज, अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेंद्र शिवाजीराव टापरे | | | 1. राज्य परीवहन विभागीय कार्यालय ,सोलापूर येथील शासकीय विश्रामग,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रू. दराच्या 08 नोटा | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि:- 14/03/2024
मी विनोद ब्राम्हानंद अस्वले, वय 36 वर्षे, व्यवसाय - सुरक्षा रक्षक, मेस्को, एजन्सी, नेमणूक अक्कलकोट बस डेपो अक्कलकोट, रा. मु.पो. उमर्गे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की, मी दि. 14/03/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक, श्री उमाकांत महाडिक यांचेशी संपर्क साधुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 14/03/2024 रोजी सायं. 05.00 वाजेचे सुमारास पंचायत समिती अक्कलकोट येथे येवुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने आले. तेथे पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता त्यावर मी सांगीतलो की,
मी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को), या सुरक्षा एजन्सी अंतर्गत सुरक्षा रक्षक या पदावर नोकरीस असुन सध्या सदर एजन्सीव्दारे माझी राज्य परिवहन डेपो, अक्कलकोट येथे सुरक्षा रक्षक म्हणुन नेमणूक आहे. माहे डिसेंबर महीन्यात श्री टापरे, सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य परिवहन विभाग, सोलापूर यांनी माझी अक्कलकोट बस डेपो येथुन गाणगापूर यात्रेसाठी सुरक्षा रक्षक म्हणुन नेमणूक केली. परंतु सदरचे ठिकाण हे कर्नाटक राज्यामध्ये येत असल्याने माझ्या एजन्सीच्या वरिष्ठांच्या परवानगीने मी सदर ठिकाणी गेलो नाही. त्यामुळे श्री टापरे साहेब, यांनी माझी अक्कलकोट बस डेपो येथून बदली करुन माझ्याऐवजी नवीन सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्याबाबत लेखी पत्र (नोटीस) दिली. त्यामुळे मी टापरे साहेबांना भेटुन सदरची नोटीस रद्य करणेबाबत विनंती केली असता. टापरे साहेब यांनी नोटीस रद्य करणेकरीता माझ्याकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी केली असुन श्री टापरे साहेब, सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य परिवहन विभाग, सोलापूर यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती तसेच टापरे साहेब यांनी मला आज दि. 14/03/2024 रोजी अक्कलकोट बस डेपो येथे भेटण्याकरीता बोलाविले आहे. अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.
त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन सुरक्षा व दक्षता अधिकारी टापरे यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर सुरक्षा व दक्षता अधिकारी टापरे यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटारसायकल वरुन अक्कलकोट बस डेपो येथे पाठविले. सदर ठिकाणी जाणेकरीता मी व पंच 01 असे निघुन काही अंतरावर गेलो असता सुरक्षा व दक्षता अधिकारी टापरे साहेब अक्कलकोट बस डेपो कडुन अक्कलकोट बस स्थानकाकडे चालत येत असल्याने मला रस्त्यातच गाठ पडले. त्यामुळे मी सदर ठिकाणी टापरे साहेब यांची भेट घेतली. तेथे टापरे साहेब यांनी मला चहा घेवु असे म्हणाल्याने तेथे जवळच असलेल्या पंचायत समिती अक्कलकोट येथील चहा कॅन्टीन वर मी, पंच व टापरे साहेब असे गेलो. सदर ठिकाणी मी टापरे साहेब यांना माझ्याविरुध्द काढलेली नोटीस रद्य करणेबाबत विनंती केली असता. टापरे साहेब यांनी माझ्याकडे लाच रक्कमेची मागणी केली. टापरे साहेब यांनी यापुर्वी माझ्याकडे 5,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली असल्याने मी त्यांना 5,000/- रुपये जास्त होतात थोडे कमी करा असे म्हणुन लाच रक्कमध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता टापरे साहेब यांनी 4,000/-

रुपयांची मागणी केली. त्यावर मी मित्राकडुन लगेचे घेवुन येतो असे सांगुन पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.
त्यानंतर सुरक्षा व दक्षता अधिकारी टापरे यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सर्व सापळापुर्व कार्यवाही पुर्ण केली. व मी हजर केलेली लाच रक्कम 4,000/- रुपये त्यात 500/- रू. दराच्या 08 नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर सुरक्षा व दक्षता अधिकारी टापरे यांच्यावर अक्कलकोट बस डेपो येथे सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन अक्कलकोट बस डेपो येथे जाणेकरीता रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे अक्कलकोट बस डेपो येथील सुरक्षा रक्षक कॅबिन येथे गेलो असता सदर ठिकाणी टापरे साहेब दिसुन आले नाहीत. त्यामुळे मी माझ्या मोबाईल क्रंमाकवरुन टापरे साहेबांना फोन करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले असता ते सोलापूर करीता निघाले असुन गाडीमध्ये असल्याबाबत त्यांनी सांगीतले. त्यावर मी त्यांना काय करु दे असे विचारले असता त्यांनी मला सोलापूर येथे येण्यास सांगीतले.
सुरक्षा व दक्षता अधिकारी टापरे साहेब यांनी मला लाच रक्कम घेवुन सोलापूर येथे येण्यास सांगीतले असल्याने मी माझे अधिकारी यांना सांगुन माझी अक्कलकोट डेपो येथील चालु असलेल्या डयुटीवर बदली रक्षक बोलावुन घेवुन पोनि महाडिक यांचेसह शासकीय वाहनाने सोलापूर येथे आलो. सदर ठिकाणी जी. एम. चौक येथे आल्यानंतर तेथे वाहन थांबवुन पोनि महाडिक यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना पुन्हा सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना पायी चालत विभाग राज्य परीवहन नियंत्रक कार्यालय व विभागीय कार्यशाळा,सोलापूर विभाग येथे रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे देखील सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे राज्य परीवहन नियंत्रक कार्यालय व विभागीय कार्यशाळा, सोलापूर विभागचे गेट समोर गेलो व तेथुन माझ्या मोबाईल क्रंमाकवरुन टापरे साहेबांना फोन करुन स्पिकर ऑन करुन संभाषण करुन मी गेटच्या बाहेर आलो असल्याबाबत सांगीतले. त्यावर काहीवेळातच टापरे साहेब राज्य परीवहन नियंत्रक कार्यालय व विभागीय कार्यशाळा, सोलापूर विभागचे गेटमधुन बाहेर आले व मला त्यांचेसोबत चालत सम्राट चौकच्या दिशेने काहीअंतर घेवुन जावुन रस्त्याच्या कडेला थांबविले. सदर ठिकाणी टापरे साहेब यांनी माझ्याकडे लाच रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना माझे शर्टचे डावेबाजुच्या खिशामध्ये अँथ्रासिन पावडर लावुन ठेवलेली लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली व तुम्ही सांगीतल्याप्रमाणे 4000/- आहेत असे सांगीतले. त्यावर टापरे साहेब यांनी सदरची लाच रक्कम 4000/- रुपये त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे नेसते पॅन्टच्या पाठीमागील उजव्याबाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी टापरे साहेब यांचेशी चर्चा करत माझ्या मोबाईलवरुन पोनि महाडिक यांना फोन करुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन त्यांनी सुरक्षा व दक्षता अधिकारी, टापरे यांना पकडले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी टापरे साहेब यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव महेंद्र शिवाजीराव टापरे, वय - 45 वर्षे, पद - सुरक्षा व दक्षता अधिकारी - राज्य परीवहन विभाग सोलापूर, मुळ रा. आय 701, सन युनिव्हर्स, नरे पुणे – 411041, सध्या रा. राज्य परीवहन विभागीय कार्यालय सोलापूर येथील शासकीय विश्रामगृह असे असल्याचे सांगीतले.
त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी वाहनामध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालय येथे पूर्ण करण्यात आली.
तरी दि. 14/03/2024 रोजीचे 17/26 ते 19/55 वा. च्या दरम्यान आरोपी लोकसेवक महेंद्र शिवाजीराव टापरे, पद - सुरक्षा व दक्षता अधिकारी - राज्य परीवहन विभाग सोलापूर यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरुपयोग करुन माझ्या विरोधात काढलेली नोटीस रदद् करण्यासाठी व माझी अक्कलकोट बस डेपो येथून बदली न करण्यासाठी पंचायत समिती अक्कलकोट येथील चहा कॅन्टीन येथे माझ्याकडे 5,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 4000/-रूपये लाच रक्कम राज्य परीवहन नियंत्रक कार्यालय व विभागीय कार्यशाळा, सोलापूर विभाग पासुन सम्राट चौककडे अंदाजे 50 मिटर अंतरावर डांबरी रस्त्यावर स्वत: स्वीकारली आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक महेंद्र शिवाजीराव टापरे, पद - सुरक्षा व दक्षता अधिकारी - राज्य परीवहन विभाग सोलापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिन्ट काढल्यानंतर मी वाचुन पाहीला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

समक्ष

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
snehal vilas chavan
**Rank (**पद**):** SI (Sub-Inspector) **No.(**क्र.**):** 15101000402SVC
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

प्रत मिळाली

पोलीस ठाणे अंमलदार
अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** JITENDRA VASANTR/
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** DGPJVKM7101